



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

दसऱ्याच्या च्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ८१ वा | मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूरचा निधी साताऱ्याच्या ठेकेदारांच्या घशात ?

## आ. रोहित पवारांचा पालकमंत्र्यांवर आरोप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, शेती आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन तसेच जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न प्रलंबित असताना, सोलापूर जिल्हा नियोजन समितीचा (डीपीसी) कोट्यवधींचा निधी साताऱ्यातील मजीर्तील ठेकेदारांच्या घशात घातला जात असल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला. 'स्थानिक जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ पक्षफोडाफोडीत मग्न असलेल्या पालकमंत्र्यांचा पूर्वइतिहास आणि कारवाया पाहिल्या, तर सुजाण नागरिक त्यांना 'करामती पालकमंत्री'च म्हणतील,' असा घणाघाती टोलाही त्यांनी लगावला. विधान परिषद पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सोमवारी (दि. १९) आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत सोलापूर येथील एआयएमए सभागृहात मेळावा पार पडला. या मेळाव्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी थेट सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह भाजप सरकारच्या कार्यपद्धतीवर टिका केली.



**स्थानिक कंत्राटदारांवर अन्याय...**

जिल्हा नियोजन समितीच्या निधीवाटपावरून प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना आमदार पवार म्हणाले, 'सोलापूरच्या बाहेरून, विशेषतः साताऱ्यातील ठेकेदारांना सोलापूरमध्ये आणले जात आहे. सोलापूरच्या डीपीसीचा कोट्यवधींचा निधी या बाहेरील ठेकेदारांना देण्याचा मोठा घोळ असल्याची चर्चा जनतेमध्ये उघडपणे सुरू आहे. सोलापूरच्या विकासासाठी मंजूर झालेला निधी स्थानिक विकासकामे, स्थानिक कंत्राटदार ऐवजी स्वतःच्या जिल्ह्यातील मर्जीतल्या ठेकेदारांकडे वळवला जात आहे; यालाच तर खरी 'करामत' म्हणतात.' या ठेकेवाटपामुळे जिल्ह्यातील कामांमध्ये पारदर्शकतेचा अभाव निर्माण झाला असून स्थानिक सुशिक्षित तरुण व कंत्राटदारांवर मोठा अन्याय होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष, केवळ फोडाफोडीचे उद्योग...**

जिल्ह्यातील दुष्काळी संकटावर बोट ठेवत पवार म्हणाले, 'सोलापूर जिल्ह्यातील कालवा सल्लागार समितीची तातडीने बैठक घेऊन शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्याचे काटेकोर नियोजन करणे, तसेच गंभीर बनत चाललेल्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवणे ही पालकमंत्र्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र, या सर्व जबाबदाऱ्या वाऱ्यावर सोडून पालकमंत्र्यांकडून (पान 2 वर..)

# पदवीधरांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी डॉ. नाना गावडे निवडणुकीच्या रिंगणात

## पदवीधर, बेरोजगार तरुण, संशोधक आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी लढण्याचा निर्धार

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** पुणे पदवीधर मतदारसंघातील पदवीधरांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी डॉ. नाना लिंगप्पा गावडे यांनी निवडणुकीच्या माध्यमातून पुढाकार घेतला आहे. पदवीधरांच्या प्रश्नांसाठी प्रतिनिधित्व, रोजगाराच्या संधी, रखडलेल्या सरकारी भरती, शिक्षण क्षेत्रातील समस्या आणि संशोधकांच्या अडचणी सोडविण्याला प्राधान्य देण्याचा निर्धार त्यांनी आपल्या प्रचारपत्रकातून व्यक्त केला आहे.

डॉ. नाना लिंगप्पा गावडे (M.Sc., Ph.D.) यांनी पदवीधर मतदारांसमोर दहा प्रमुख मुद्दे मांडले आहेत. यामध्ये एमपीएससी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांपासून ते




प्राध्यापक भरती, सीएचबी प्राध्यापकांचे प्रश्न, बेरोजगार तरुणांना रोजगार आणि शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराला आळा घालण्यापर्यंत विविध विषयांचा समावेश आहे.

**एमपीएससी विद्यार्थी आणि सरकारी भरतीचे प्रश्न ऐरणीवर**

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या प्रशासकीय अडचणी सोडविण्यासाठी ठोस प्रयत्न करण्याचे आश्वासन गावडे यांनी दिले आहे. तसेच रखडलेल्या सरकारी भरती प्रक्रिया पूर्ण करणे, भरती प्रक्रियेतील आर्थिक गैरव्यवहारांच्या आरोपांची चौकशी करणे आणि पात्र उमेदवारांना न्याय मिळवून देणे, या मुद्द्यांवर त्यांनी भर दिला आहे.

**प्राध्यापक भरती आणि सीएचबी प्राध्यापकांना न्याय**

प्राध्यापक भरती प्रक्रियेतील कथित आर्थिक गैरव्यवहारांची चौकशी करून पारदर्शकता आणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच तासिका तत्त्वावर (सीएचबी) काम करणाऱ्या प्राध्यापकांना न्याय मिळवून देणे, त्यांच्या मानधनाचा प्रश्न सोडविणे आणि कामाच्या अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका मांडली आहे.

**बेरोजगार तरुणांसाठी रोजगाराच्या संधी**

सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, खासगी आणि शासकीय क्षेत्रातील रोजगाराभिमुख उपक्रमांना चालना देणे आणि पदवीधरांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करणे, हेही त्यांच्या प्रमुख मुद्द्यांमध्ये आहे. (पान 2 वर..)

# आरक्षित शाळेच्या जागेवरील बांधकामाची चौकशी रखडली

## २८ ऑक्टोबरपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलनाचा इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या जागेवरील बांधकाम प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांनी महापालिका प्रशासनाला आणखी आठवड्याची मुदत दिली आहे. या कालावधीत ठोस आणि समाधानकारक कार्यवाही न झाल्यास बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६ पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा नीलेश संगेपाग यांनी पत्रकार परिषदेत दिला.

या प्रकरणी आंदोलकांनी १९ ऑगस्ट २०२६ रोजी आंदोलन



केले होते. त्यानंतर सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी २ सप्टेंबर २०२६ रोजी चौकशी समिती स्थापन केली. मात्र, समिती स्थापन होऊनही अद्याप ठोस आणि समाधानकारक कार्यवाही झालेली दिसून येत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

**चौकशी समितीच्या कामकाजाबाबत प्रश्नचिन्ह**

आरक्षित जागेवरील बांधकाम प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार जाऊनही स्पष्ट माहिती मिळत नसल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. चौकशी समिती नियुक्त झाल्यानंतर तिच्या कामकाजाबाबत पारदर्शक माहिती जनतेसमोर येणे अपेक्षित होते; मात्र तसे होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

**अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव असल्याचा संशय**

संबंधित अधिकाऱ्यांशी झालेल्या संवादातून या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप अथवा दबाव असल्याची शंका निर्माण झाल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. प्रशासनाने कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता स्वतंत्रपणे आणि निष्पक्षपणे चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात (पान 2 वर..)




## संपादकीय

# उच्च शिक्षण आनंददायी व्हायचे तर...

शिक्षणपद्धती, मूल्यमापन, वसतिगृह-कॅम्पसमधील वातावरण आणि विद्यार्थ्यांना अपयशातून पुन्हा उभे राहण्याची संधी देणाऱ्या व्यवस्थेचा नव्याने विचार करण्याची गरज आहे.

विद्यापीठे किंवा संस्थांमधील काही विद्यार्थी विशेषतः संवेदनशील गटात मोडतात. उच्च शिक्षण घेत असताना त्यांच्यावर शैक्षणिक दबाव, आर्थिक ताण, सामाजिक वातावरणाशी जुळवून घेण्याचा येणाऱ्या अडचणी, आयुष्यातील स्थित्यंतरे, विविध आव्हाने आणि मैत्री संबंधांतील समस्या यांचा भार असू शकतो. गेल्या काही वर्षांत ही आव्हाने बदलत गेली आहेत. आयआयटीच्या बाहेर त्यांच्याकडे अत्यंत आदराने पाहिले जाते. सामाजिकदृष्ट्या विशेषाधिकारप्राप्त गट मानला जात असूनही काही विद्यार्थ्यांना वैयक्तिक आयुष्यात नैराश्याचा सामना करावा लागतो. त्यामागे पुढील कारणे आहेत. काही विद्यार्थ्यांना अभ्यासातील रस कमी होतो आणि त्यांच्यापैकी काही जण अनिष्ट कृती आणि सवयींकडे वळतात. वसतिगृहांमधील राहणीमानाशी संबंधित समस्यांबाबत काही विद्यार्थी आणि प्राध्यापक चिंतित आहेत. बहुतेक वसतिगृहांवर क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा भार आहे. त्यामुळे तेथील राहणीमान अपेक्षेप्रमाणे राहत नाही. काही विद्यार्थ्यांची नियमित अभ्यासाची सवय सुटणे ही सामान्य बाब आहे. मानसिक थकवा, स्पष्ट उद्दिष्टांचा अभाव, डिजिटल माध्यमांमुळे होणारे लक्ष विचलित होणे किंवा अभ्यासाचा प्रचंड भार ही त्यामागील कारणे असू शकतात. अभ्यास हा दैनंदिन दिनक्रमाचा भाग राहिला नाही की काम पुढे ढकलण्याची सवय वाढते. त्यामुळे पुन्हा शिस्तबद्ध दिनक्रमाकडे वळणे आणखी कठीण होते.

वरील समस्यांवर सध्याच्या उपाययोजनांपेक्षा पुढे जावे लागेल. मुख्य म्हणजे समुपदेशन सेवा अधिक प्रभावी आणि सक्रिय करावी लागेल. संस्थेत नव्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांना तेथे व्यतीत होणारा काळ आणि त्यांचे राहणीमान शक्य तितके सुखकर आणि संस्मरणीय करण्याचा प्रयत्न या सेवेमार्फत झाला पाहिजे. समुपदेशन सेवेमध्ये प्राध्यापक समुपदेशक आणि विद्यार्थी मार्गदर्शकांचा समावेश असलेले अनेक संघ असले पाहिजेत. विद्यार्थ्यांशी जवळचे आणि सहानुभूतीपूर्ण नाते निर्माण करणे ही प्राध्यापक समुपदेशकाची भूमिका असली पाहिजे. विद्यार्थ्यांचा संस्थेतील वास्तव्याचा संपूर्ण काळ आणि त्यानंतरही हे नाते टिकले पाहिजे. विद्यार्थ्यांसोबत मैत्र जुळले पाहिजे. त्यांच्या समस्यांची माहिती घेतली पाहिजे. अनेक विद्यार्थ्यांच्या संवादाशी संबंधित समस्या असतात. काहींना स्वतःच्या मातृभाषेतून आपल्या कल्पना व्यक्त करण्यात अडचणी येतात. काहींना आर्थिक समस्या असतात. वारंवार अपयशामुळे काहींनी आत्मविश्वास गमावलेला असतो. शिकण्यातील रस गमावलेल्या किंवा अपेक्षित कामगिरी करण्यात अपयशी ठरणाऱ्या व्यक्तीला मदत करण्यासाठी विविध रणनीती विकसित करण्याची गरज आहे. काही विद्यार्थ्यांना रॅगिंगला सामोरे जावे लागते. आम्ही आयआयटी गुवाहाटीमध्ये काही उत्कृष्ट व्यावसायिक समुपदेशकांची नियुक्ती केली होती. अनेक संघही स्थापन केले. वसतिगृहांतील राहणीमान सुधारण्यासाठी तरुण आणि उत्साही प्राध्यापकांनी महिन्यातून एकदा रविवारी वसतिगृहांत विद्यार्थ्यांसोबत रात्रीचे जेवण किंवा नाश्ता करावा, यासाठी आम्ही प्रोत्साहन दिले.

विद्यार्थ्यांच्या तक्रारी आणि गाऱ्हाणी स्वीकारण्यासाठी कार्यक्षम मार्गाची व्यवस्थेने निर्माण केले पाहिजे. अधिक साहाय्यकारी वातावरण निर्माण करण्यात शैक्षणिक नेतृत्व, प्राध्यापक, समवयस्कांचे जाळे आणि धोरणकर्ते महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. यातील सर्वात पहिला मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक वातावरणाची आवश्यकता आहे. हे वातावरण सकारात्मक, आनंदी आणि विविध उपक्रमांनी भरलेले असले पाहिजे. त्यातून प्रत्येक विद्यार्थी आणि त्यांच्या आकांक्षांचे संवर्धन होईल.

विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे हे सोपे काम नाही. प्रत्येक वेगळ्या विद्यार्थ्याला प्रेरित करण्यासाठी उत्कटता, बांधिलकी आणि सहानुभूतीची आवश्यकता असते. अध्यापन-अध्ययनाच्या अनुभवामध्ये विद्यार्थ्यांना अधिक सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे आणि त्यात त्यांना पूर्णपणे गुंतवून ठेवण्याचे विविध मार्ग आहेत. त्यासाठी त्यांना विचारपूर्वक सहभाग आवश्यक आहे. पुरेशी 'स्टुडंट केअर' व्यवस्था निर्माण करण्यासाठी चौकटीबाहेरील कल्पनांची आवश्यकता आहे. आयआयटी गुवाहाटीमध्ये आम्ही संपूर्ण आयआयटी व्यवस्थेतील एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणून 'सेंटर फॉर क्रिएटिव्हिटी'ची निर्मिती केली होती. तेथे तीन वर्षे या केंद्राने पदवी तसेच पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ताणव कमी करण्याचे माध्यम म्हणून काम केले. सादरीकरण कलांशी संबंधित उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी हे केंद्र विकसित केले होते. प्रत्येक सत्रात आम्ही सादरीकरण कलांच्या पुढील शाखांमध्ये श्रेयांकांचे अभ्यासक्रम चालवत होतो. या अभ्यासक्रमांना शैक्षणिक अधिसभेची मान्यता होती.

भारतीय शास्त्रीय नृत्यामध्ये आसामच्या सत्रिया नृत्यप्रकारावर विशेष भर होता. वाद्यसंगीत व्हायोलिन आणि तबला आणि हिंदुस्थानी गायन संगीत यांचा वापर होत असे. निवासी कलाकारांच्या एका संघासह संस्थेने विचारपूर्वक अध्ययन आणि काळजीपूर्वक नियोजनाच्या माध्यमातून देशातील काही नामांकित सांस्कृतिक संस्थांसोबत सहयोगी उपक्रम राबवले. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या मनापासून सहभाग आणि त्यांचा उत्साह ठळक होता. विद्यार्थ्यांना आपल्या भावना आणि सर्जनशीलता आनंदाने व्यक्त करण्यासाठी अवकाश उपलब्ध करून देणे ही या मागील मुख्य कल्पना आहे. अशा प्रयत्नांमध्ये विज्ञानविषयक छंदमंडळे महत्त्वाची भूमिका बजावतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांना अपयशावर मात करण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. प्रत्येक वसतिगृहासाठी संस्थेने प्राध्यापकांमधून लोकपाल किंवा लोकप्रतिनिधी नियुक्त केले पाहिजेत. बिटस् व्यवस्थेने 'मित्र' किंवा 'साथी' या स्वरूपात याच्याशी जवळीक साधणारी संकल्पना स्वीकारली आहे. हा एक यशस्वी उपक्रम आहे.

शैक्षणिक उत्कृष्टतेशी तडजोड न करता विद्यार्थ्यांचे कल्याण होण्यासाठी कोणत्या व्यावहारिक सुधारणा करता येतील, यासाठी काही सूचना आहेत. पदवी शिक्षण चार वर्षांतच पूर्ण करण्याची आवश्यकता नाही. आंतरराष्ट्रीय श्रेयांक पद्धतीनुसार पदवीसाठी जवळपास १६० श्रेयांकांची आवश्यकता असते. त्यामुळे त्यासाठीची कालमर्यादा चार वर्षांऐवजी पाच वर्षे निश्चित करता येऊ शकते. एखादा विद्यार्थी संपूर्ण अभ्यासभार स्वीकारण्यास तयार नसेल, तर तो एखाद्या सत्रात कमी अभ्यासभार निवडू शकतो. मात्र एखादा विद्यार्थी चार वर्षांतच अभ्यासक्रम पूर्ण करू शकत असेल, तर त्याला त्यापासून रोखले जाऊ नये. अध्यापनशास्त्रातील 'मूल्यमापन' घटकामध्ये सुधारणा करता येतील. शैक्षणिक अधिसभा एखाद्या अभ्यासक्रमातील किमान ४० ते ५० टक्के घटक 'ओपन बुक' स्वरूपात ठेवण्याची शिफारस करू शकते. अशा घटकांमध्ये असाइनमेंट, प्रश्नमंजूषा आणि अंशतः पर्यवेक्षणाखाली घेतल्या जाणाऱ्या परीक्षांचाही समावेश असू शकतो. 'ओपन बुक' मूल्यमापनाचे प्रमाण प्रत्येक विभागानुसार वेगवेगळे असू शकते. प्रत्येक सत्रातील किमान एक अभ्यासक्रम किंवा विषय 'फ्लिप्ड क्लासरूम' या अध्यापन पद्धतीने शिकवला जाऊ शकतो. प्रयोगशाळेतील अभ्यासक्रमांसाठी कोणतीही अंतिम परीक्षा घेण्याची आवश्यकता नाही. त्यांचे मूल्यमापन सातत्यपूर्ण पद्धतीने करता येऊ शकते. शैक्षणिकदृष्ट्या मागे असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे प्रलंबित विषय पूर्ण करण्यासाठी अधिक संधी दिल्या पाहिजेत. त्यामुळे त्यांचे भविष्य कायमचे रुळावरून घसरण्यापासून वाचते. विद्यार्थ्यांना आधार देणारे धोरण त्यांच्यात संकटांचा सामना करण्याची क्षमता वाढवते. त्यामुळे त्यांना अपयशाची भीती न बाळगता शिकण्यासाठी आवश्यक अवकाश मिळतो आणि ते यशस्वीपणे ज्ञान आत्मसात करू शकतात.

# धम्म विजयादशमी : सम्राट अशोकांच्या धम्म विजयापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेपर्यंत

मानवी इतिहासात काही घटना केवळ एखाद्या काळापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या पुढील अनेक पिढ्यांना विचार करण्याची, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची आणि नव्या समाजनिर्मितीची प्रेरणा देतात. सम्राट अशोकाचा धम्म विजय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेला बौद्ध धम्म हे भारतीय इतिहासातील असेच दोन महत्त्वपूर्ण संदर्भ आहेत. एका बाजूला युद्धातून झालेल्या विनाशाची जाणीव झाल्यानंतर सम्राट अशोकाने नैतिक मूल्यांना राज्यकारभाराच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला; तर दुसऱ्या बाजूला जातीय विषमता आणि अस्पृश्यतेच्या अन्यायकारक व्यवस्थेला आव्हान देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा नवा मार्ग स्वीकारला. या दोन्ही ऐतिहासिक प्रवाहांचा केंद्रबिंदू माणसाचे कल्याण, करुणा, विवेक, समता आणि बंधुता हा आहे. धम्म विजयादशमीच्या निमित्ताने या विचारांचा मागोवा घेणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण करणे नव्हे, तर वर्तमानातील सामाजिक आव्हानांसमोर मानवी मूल्यांची भूमिका पुन्हा अधोरेखित करणे होय.

प्राचीन भारताच्या इतिहासात सम्राट अशोकाचे स्थान विलक्षण महत्त्वाचे आहे. मौर्य साम्राज्याचा विस्तार करणारा एक सामर्थ्यशाली शासक म्हणून त्याची सुरुवातीची ओळख होती. मात्र कलिंग युद्धानंतर त्याच्या जीवनदृष्टीत महत्त्वपूर्ण परिवर्तन घडले. इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात झालेल्या या युद्धात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. अनेक लोक मृत्युमुखी पडले, अनेकांना कैद करून नेण्यात आले आणि असंख्य कुटुंबांचे जीवन विस्कळीत झाले. युद्ध जिंकूनही त्यातून निर्माण झालेल्या दुःखाची आणि मानवी हानीची जाणीव अशोकाला झाली. त्याच्या तेराव्या प्रमुख शिलालेखात कलिंग युद्धाच्या परिणामांविषयी आणि त्यानंतर त्याला झालेल्या पश्चात्तापाविषयी उल्लेख आढळतो. या अनुभवाने विजयाच्या पारंपरिक संकल्पनेला प्रश्न विचारण्याची प्रेरणा दिली. शत्रूच्या भूमीवर सत्ता मिळविणे हा विजय असू शकतो; परंतु त्या विजयासाठी असंख्य निरपराधांचे जीवन उद्ध्वस्त होत असेल, तर त्याचे नैतिक मूल्य काय, हा प्रश्न अशोकाच्या धम्मविषयक भूमिकेतून पुढे येतो.

अशोकाने युद्धविजयापेक्षा धम्मविजयाला अधिक महत्त्व दिले. धम्मविजय म्हणजे केवळ सैन्याच्या सामर्थ्याने प्रदेश जिंकणे नव्हे, तर सदाचार, करुणा, सत्यनिष्ठा, सहिष्णुता आणि लोककल्याण यांच्या माध्यमातून माणसांची मने जिंकणे होय. या विचारात सत्तेच्या वापराला नैतिक जबाबदारीची जोड देण्यात आली. शासकाचे मोठेपण केवळ त्याच्या साम्राज्याच्या विस्तारावर किंवा सैन्याच्या सामर्थ्यावर अवलंबून नसून तो आपल्या प्रजेच्या जीवनात किती सुरक्षितता, न्याय आणि कल्याण निर्माण करतो, यावरही ठरते. अशोकाच्या धम्मविषयक भूमिकेतून राज्यकारभाराच्या उद्दिष्टांकडे पाहण्याची नवी दृष्टी विकसित झाली. सत्ता ही लोकांवर वर्चस्व गाजविण्याचे साधन नसून लोकांच्या हितासाठी वापरली जाणारी जबाबदारी आहे, हा विचार त्याच्या ऐतिहासिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे.

सम्राट अशोकाने मांडलेला धम्म हा कोणत्याही एका धार्मिक समुदायापुरता मर्यादित नव्हता. त्यात आई-वडिलांचा आदर, वडीलधाऱ्यांशी सन्मानाने वागणे, सेवकांशी न्याय्य व्यवहार करणे, सत्य बोलणे, प्राणिमात्रांविषयी दया बाळगणे, आत्मसंयम राखणे आणि विविध धार्मिक परंपरांविषयी आदर ठेवणे अशा नैतिक मूल्यांना महत्त्व होते. वेगवेगळ्या विचारांचे आणि श्रद्धांचे लोक समाजात एकत्र राहतात, तेव्हा परस्परांचा अवमान करण्याऐवजी एकमेकांच्या मतांचा आदर करणे आवश्यक असते, अशी भूमिका अशोकाच्या शिलालेखांतून दिसते. आजच्या काळात धार्मिक, भाषिक, जातीय आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेल्या भारतासाठी हा विचार विशेष महत्त्वाचा आहे. मतभिन्नता ही समाजजीवनाचा स्वाभाविक भाग आहे; मात्र मतभिन्नतेचे रूप द्वेष, हिंसा किंवा सामाजिक बहिष्कारात बदलू नये, यासाठी नैतिक विवेक आणि सहिष्णुता आवश्यक असते.

अशोकाच्या धम्मविजयाचा विचार त्याच्या लोककल्याणकारी कार्याशीही जोडलेला आहे. त्याच्या शिलालेखांत मानवांसाठी तसेच प्राण्यांसाठी वैद्यकीय सुविधांची व्यवस्था, प्रवासमार्गांवर विहिरी आणि वृक्षारोपण, प्रशासकीय अधिकाऱ्यांना लोकांच्या हिताची काळजी घेण्याचे निर्देश अशा उपाययोजनांचे संदर्भ आढळतात. शासन आणि समाज यांच्यातील संबंध केवळ करसंकलन, कायदा आणि दंड यांपुरते मर्यादित नसावेत, तर लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडविणे हेही शासनाचे कर्तव्य असावे, अशी जाणीव या भूमिकेतून व्यक्त होते. अशोकाचा ऐतिहासिक अनुभव आजच्या प्रशासनालाही प्रश्न विचारतो. विकासाची मोजणी केवळ आर्थिक वाढ, पायाभूत सुविधा किंवा सत्तेच्या विस्ताराने करायची की सामान्य माणसाला मिळणारे आरोग्य, शिक्षण, न्याय, सुरक्षितता आणि प्रतिष्ठा यांनाही तितकेच महत्त्व द्यायचे, हा प्रश्न धम्मविजयाच्या विचारातून उपस्थित होतो.

या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेकडे पाहिले, तर भारतीय समाजपरिवर्तनाच्या इतिहासातील आणखी एक निर्णायक अध्याय समोर येतो. डॉ. आंबेडकरांचे संपूर्ण जीवन जातीय विषमता, अस्पृश्यता आणि सामाजिक अन्यायाविरुद्धच्या संघर्षाने व्यापलेले होते. शिक्षण, सार्वजनिक सुविधा, रोजगार आणि सामाजिक प्रतिष्ठा या क्षेत्रांत समान अधिकार मिळविण्यासाठी त्यांनी सातत्याने लढा दिला. स्वतः उच्च शिक्षण प्राप्त करूनही जातीय पूर्वग्रहांमुळे अपमान सहन करावा लागल्याचा अनुभव त्यांच्या विचारविश्वाला आकार देणारा ठरला. त्यांच्या दृष्टीने जातिव्यवस्था ही केवळ व्यक्तींच्या वर्तनातील काही चुकीच्या सवयींची बाब नव्हती; ती समाजातील अधिकार, संधी, प्रतिष्ठा आणि मानवी संबंध यांची विषम विभागणी करणारी व्यवस्था होती. त्यामुळे समाजपरिवर्तनासाठी व्यक्तीच्या विचारांमध्ये आणि सामाजिक संस्थांच्या रचनेमध्ये दोन्ही स्तरांवर बदल घडविणे आवश्यक होते.

१९३५ मध्ये येवला येथे झालेल्या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मात जन्मलो असलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही, अशी ऐतिहासिक घोषणा केली. ही घोषणा केवळ भावनिक प्रतिक्रिया नव्हती, तर दीर्घकाळ केलेल्या सामाजिक निरीक्षणाचा, वैचारिक अभ्यासाचा आणि समतेच्या पर्यायी मार्गाच्या शोधाचा परिणाम होती. त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास करून त्यांच्या तत्त्वज्ञानाचा आणि सामाजिक परिणामांचा विचार केला. माणसाला समान प्रतिष्ठा मिळते का, विवेकाला स्थान आहे का, अन्यायकारक रूढींना प्रश्न विचारता येतात का आणि समाजात बंधुता निर्माण करण्याची क्षमता आहे का, हे प्रश्न त्यांच्या विचारप्रक्रियेत महत्त्वाचे होते. बौद्ध धम्मातील प्रज्ञा, करुणा आणि समता या मूल्यांमध्ये त्यांना मानवी मुक्तीचा आणि सामाजिक परिवर्तनाचा आधार दिसला. त्यामुळे धम्मस्वीकार हा त्यांच्या आयुष्यातील स्वतंत्र धार्मिक निर्णय असण्याबरोबरच अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेविरुद्धचा विचारपूर्वक घेतलेला निर्णय होता.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी धम्म विजयादशमी दिनी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. भदंत चंद्रमणी यांनी त्यांना त्रिशरण आणि पंचशील दिले. त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्या काळातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली, तर या घटनेचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेच्या अनुभवातून बाहेर पडत मोठ्या संख्येने लोकांनी समान प्रतिष्ठा, विवेकनिष्ठ जीवन आणि बंधुत्वाच्या मूल्यांवर आधारित नवा मार्ग स्वीकारला. हा प्रसंग केवळ धार्मिक विधी नव्हता; तो आत्मसन्मानाचा सार्वजनिक आविष्कार आणि सामाजिक समतेच्या दिशेने उचललेले ऐतिहासिक पाऊल होते. दीक्षाभूमीवरील घटना आजही सामाजिक न्याय, स्वाभिमान आणि परिवर्तनाच्या आकांक्षेचे प्रतीक मानली जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुयायांना दिलेल्या बावीस प्रतिज्ञांना या धम्मदीक्षेत विशेष महत्त्व आहे. या प्रतिज्ञांमधून अंधश्रद्धा, कर्मकांड आणि जातीय विषमता यांपासून दूर जाण्याचा, बुद्धांच्या शिकवणीचा स्वीकार करण्याचा आणि समतेच्या मूल्यांशी बांधिलकी ठेवण्याचा संदेश मिळतो. कोणतीही परंपरा केवळ पूर्वापार चालत आली आहे म्हणून तिचे अंधानुकरण न करता तिची चिकित्सा करणे आवश्यक आहे, ही विवेकनिष्ठ भूमिका त्यातून व्यक्त होते. माणसाच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या रूढी नाकारणे, नैतिकतेच्या आधारावर जीवन जगणे आणि स्वतःच्या कृतींची जबाबदारी स्वीकारणे हे या प्रतिज्ञांचे महत्त्वाचे पैलू आहेत. धम्माचा स्वीकार म्हणजे केवळ नाव किंवा धार्मिक ओळख बदलणे नव्हे; तर विचार, वर्तन आणि सामाजिक संबंधांमध्ये परिवर्तन घडविण्याची बांधिलकी स्वीकारणे होय. त्यामुळे बावीस प्रतिज्ञांचे महत्त्व त्यांच्या शब्दांपुरते न ठेवता दैनंदिन जीवनात त्यांचा अर्थ समजून घेण्यात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धम्मविषयक विचारांत सामाजिक समतेला मध्यवर्ती स्थान आहे. बुद्धांनी दुःख, त्याची कारणे आणि दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग यांचे विवेचन केले. लोभ, द्वेष आणि मोह यांमुळे व्यक्तीचे जीवन अस्थिर होते, तर प्रज्ञा, करुणा आणि नैतिक आचरणामुळे अधिक संतुलित जीवन शक्य होते. अष्टांगिक मार्गातील सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म आणि सम्यक आजीविका यांसारख्या तत्त्वांचा अर्थ केवळ वैयक्तिक साधनेपुरता मर्यादित नाही. सत्यनिष्ठ संवाद, न्याय्य व्यवहार, अहिंसक वर्तन आणि इतरांच्या दुःखाविषयी संवेदनशीलता यांमधून त्यांची सामाजिक उपयुक्तता दिसते. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धम्माचे आकलन आधुनिक समाजातील विषमता आणि मानवी हक्कांच्या प्रश्नांशी जोडले. त्यांच्या नवयान दृष्टिकोनात धमार्चे महत्त्व सामाजिक नैतिकता, समता आणि बंधुता यांना बळ देण्यात आहे.

सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक भूमिका एकसारख्या नव्हत्या; त्यांचे काळ, परिस्थिती आणि कार्यपद्धती वेगवेगळ्या होत्या. तरीही त्यांच्या विचारांत एक महत्त्वपूर्ण साम्य दिसते. अशोकाने युद्धविजयापेक्षा नैतिक धम्मविजयाला प्राधान्य दिले, तर आंबेडकरांनी जन्माधारित विषमतेऐवजी समता आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित समाजाचा आग्रह धरला. अशोकाने राज्यसत्तेला लोककल्याणाच्या जबाबदारीशी जोडण्याचा प्रयत्न केला; आंबेडकरांनी संविधान, लोकशाही आणि सामाजिक न्यायाच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला समान नागरिकत्व मिळावे यासाठी कार्य केले. दोघांच्या विचारांत मानवी कल्याणाला महत्त्व आहे. या साम्याचा विचार करताना त्यांच्या ऐतिहासिक संदर्भांतील भिन्नता लक्षात ठेवणे आवश्यक असले, तरी नैतिकता, करुणा, समता आणि लोकहित या मूल्यांची परंपरा समजून घेण्यासाठी त्यांचा तुलनात्मक अभ्यास उपयुक्त ठरतो.

आज भारतीय संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूलभूत मूल्ये स्वीकारली आहेत. मात्र प्रत्यक्ष सामाजिक जीवनात जातीय भेदभाव, अस्पृश्यतेची अवशेषरूपे, स्त्री-पुरुष असमानता, आर्थिक विषमता आणि धार्मिक विद्वेष यांसारखी आव्हाने कायम आहेत. माणसाची गुणवत्ता, कर्तृत्व आणि संवेदनशीलता यांपेक्षा त्याची जात, धर्म, भाषा किंवा जन्म यांना अधिक महत्त्व दिले जाते, तेव्हा लोकशाहीची मूल्ये कमकुवत होतात. सामाजिक माध्यमांवरील अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि असहिष्णुतेमुळे परस्परांबद्दल अविश्वास वाढण्याची शक्यता निर्माण होते. अशा वेळी धम्मविजयाचा अर्थ नव्याने समजून घेणे आवश्यक आहे. दुसऱ्याला कमी लेखणे, त्याचा अपमान करणे किंवा त्याच्या अधिकारांवर मयार्दा आणणे हा विजय नाही. स्वतःच्या पूर्वग्रहांवर मात करणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे, संवादाला प्राधान्य देणे आणि सर्वांना समान प्रतिष्ठा देणे हा खऱ्या धम्मविजयाचा मार्ग आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातही धम्मविजय आणि धम्मदीक्षेचा सामाजिक आशय उपयोगी ठरतो. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविणे किंवा रोजगार प्राप्त करणे नव्हे; ते विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार आणि जबाबदार नागरिकत्व विकसित करणारे माध्यम आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना जात, धर्म, लिंग, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभावाचा सामना करावा लागू नये. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढण्याची आणि अन्यायाबद्दल संवेदनशील राहण्याची प्रेरणा द्यावी. संविधानिक मूल्ये आणि मानवी हक्क यांचे शिक्षण व्यवहाराशी जोडले गेले, तर समतेची जाणीव अधिक दृढ होऊ शकते. विचारस्वातंत्र्य, समान संधी आणि परस्पर आदर यांवर आधारित शैक्षणिक वातावरण निर्माण करणे ही धम्माच्या नैतिक मूल्यांना आधुनिक जीवनात स्थान देण्याची एक महत्त्वाची दिशा आहे.

धम्मविजयाचा विचार स्त्रियांच्या स्वातंत्र्याशी, दिव्यांग व्यक्तींच्या प्रतिष्ठेशी आणि वंचित समुदायांच्या हक्कांशीही जोडलेला आहे. स्त्रियांना शिक्षण, रोजगार, सुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्ती, वृद्ध, आदिवासी समुदाय, भटके-विमुक्त समूह आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिक यांच्या गरजा समजून घेऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समान सन्मानाने सहभागी करून घेणे ही न्याय्य समाजाची कसोटी आहे. करुणा म्हणजे केवळ सहानुभूती व्यक्त करणे नव्हे, तर अन्याय आणि अडथळे दूर करण्यासाठी प्रत्यक्ष कृती करणे होय. सामाजिक संस्थांनी आणि शासनाने सर्वसमावेशक धोरणे राबविली, तर बंधुतेचे मूल्य केवळ भाषणांमध्ये न राहता प्रत्यक्ष अनुभवता येईल.

धम्म विजयादशमीच्या निमित्ताने इतिहासाचे स्मरण करताना केवळ सम्राट अशोक किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायार्चे गौरवगान करून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन आजच्या समाजातील अन्याय, विषमता आणि असहिष्णुता यांना सामोरे जाणे अधिक महत्त्वाचे आहे. अशोकाच्या धम्म विजयातून सत्तेच्या वापराला नैतिकतेची जोड देण्याची प्रेरणा मिळते, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेतून स्वाभिमान, विवेक आणि समतेसाठी संघर्ष करण्याचे बळ मिळते. आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण इतरांना समान प्रतिष्ठा देतो का, भेदभावाला विरोध करतो का, दुर्बलांच्या हक्कांचे संरक्षण करतो का आणि संविधानिक मूल्यांचे पालन करतो का, हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. धम्माचा खरा अर्थ आचरणात उतरल्याशिवाय सामाजिक परिवर्तन शक्य नाही.

धम्मविजयादशमीचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. शस्त्राच्या सामर्थ्याने मिळविलेला विजय तात्पुरता असू शकतो; परंतु विवेक, करुणा आणि न्याय यांच्या आधारे मिळविलेला विश्वास अधिक टिकाऊ असतो. सम्राट अशोकाने युद्धाच्या विनाशातून नैतिक विजयाचे महत्त्व अधोरेखित केले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षेच्या माध्यमातून सामाजिक समता आणि आत्मसन्मानाच्या नव्या अध्यायाला सुरुवात केली. या दोन्ही ऐतिहासिक वारशांचा सन्मान करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे जातिभेदमुक्त, विवेकनिष्ठ, करुणामय आणि न्यायपूर्ण समाजनिर्मितीसाठी सक्रिय योगदान देणे. माणसाचे मोठेपण दुसऱ्याला कमी लेखण्यात नसून त्याला समान प्रतिष्ठा देण्यात आहे, ही जाणीव समाजमनात रुजवली पाहिजे. द्वेषाऐवजी करुणा, वर्चस्वाऐवजी बंधुता आणि अंधानुकरणाऐवजी विवेक यांची निवड करणे, हाच धम्मविजयाचा खरा अर्थ आहे.



**- डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्र, पाली व बौद्ध साहित्याचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

पान १ वरून

## पदवीधरांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी...

**शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराला आळा घालण्याची भूमिका**

भरती, नियुक्त्या आणि शैक्षणिक संस्थांमधील कथित अनियमितता रोखण्यासाठी पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली आहे. पदवीधरांच्या समस्या नियमितपणे ऐकून घेणे, त्यांच्या प्रश्नांवर संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करणे आणि मतदारसंघातील पदवीधरांशी सातत्याने संवाद ठेवणे, यावरही त्यांनी भर दिला आहे.

**संशोधक आणि उच्चशिक्षित तरुणांसाठी संधी**

पीएच.डी. आणि उच्चशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना संशोधन, अध्यापन आणि रोजगार क्षेत्रात अधिक संधी मिळाव्यात, यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन गावडे यांनी दिले आहे. संशोधनासाठी निधी, शिष्यवृत्ती आणि संशोधनविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मागण्यांनाही त्यांनी प्राधान्य दिले आहे.

**पदवीधरांच्या आर्थिक अडचणी आणि नियमित संवादावर भर**

पदवीधरांसाठी रोजगाराभिमुख योजना, स्वयंरोजगाराच्या संधी आणि आर्थिक अडचणींवर उपाययोजना करण्याची गरज त्यांनी मांडली आहे. तसेच पदवीधरांच्या प्रश्नांवर नियमित संवाद साधून त्यांच्या समस्या संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविणे आणि त्यावर पाठपुरावा करणे, हा त्यांच्या भूमिकेचा महत्त्वाचा भाग आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघातील पाच जिल्ह्यांमधील पदवीधरांचे प्रश्न विविध व्यासपीठांवर मांडण्याचा निर्धारही त्यांनी प्रचारपत्रकातून व्यक्त केला आहे.

'पदवीधरांचे प्रश्न, पदवीधरांचा आवाज आणि पदवीधरांसाठी संघर्ष' हा संदेश देत डॉ. नाना लिंगप्पा गावडे यांनी पदवीधरांच्या प्रश्नांवर केंद्रित भूमिका मतदारांसमोर मांडली आहे. आगामी निवडणुकीत पदवीधर मतदार त्यांच्या भूमिकेला कसा प्रतिसाद देतात, याकडे लक्ष लागले आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघातील सर्व जिल्ह्यांतील पदवीधरांशी नियमित संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पदवीधरांनी पसंती क्रमांक एकचे मत देऊन विजयी करावे, असे आवाहनही त्यांनी केले. मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे.

## आरक्षित शाळेच्या जागेवरील बांधकामाची...

अधिकाऱ्यांवर दबाव आणला जात असल्याचे दर्शविणारे काही पुरावे आपल्याकडे उपलब्ध असल्याचेही आंदोलकांनी प्रेसनोटमध्ये म्हटले आहे. आवश्यकतेनुसार हे पुरावे योग्य वेळी जनतेसमोर मांडण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

**जिल्ह्याबाहेरील भाजप मंत्र्याच्या कथित हस्तक्षेपाचा आरोप**

या प्रकरणात जिल्ह्याबाहेरील एका भाजप मंत्र्याचा दबाव अथवा हस्तक्षेप असल्याचा संशय आंदोलकांनी व्यक्त केला आहे. यासंदर्भात काही पुरावे उपलब्ध असल्याचा दावा करत, संबंधित पुराव्यांची पडताळणी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणण्याची मागणी त्यांनी केली आहे. मात्र, संबंधित मंत्र्याचे नाव प्रेसनोटमध्ये नमूद करण्यात आलेले नाही.

**प्रशासनाला आणखी आठवड्याची मुदत**

आंदोलकांनी आतापर्यंत संयमाची भूमिका घेतली असून प्रशासनाला वेळही दिला आहे. मात्र, चौकशी समितीकडून ठोस कार्यवाही, चौकशीचा अहवाल आणि आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीची माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे.

दि. २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत समाधानकारक कार्यवाही न झाल्यास बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात येईल. या आंदोलनादरम्यान प्रकरणाशी संबंधित पुरावे एक-एक करून जनतेसमोर सादर केले जातील, असेही प्रेसनोटमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

**'संयमाला कमजोरी समजू नका'**

आंदोलकांनी प्रशासनाला दिलेला संयमाचा इशारा हा कमजोरी समजू नये, असे ठामपणे नमूद केले आहे. कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा राजकीय व्यक्तीने दबाव आणून हा प्रश्न दडपण्याचा प्रयत्न करू नये. जनतेच्या हक्काचा आणि सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणाचा प्रश्न असल्याने लोकशाही मार्गाने शेवटपर्यंत लढा सुरू ठेवण्यात येईल, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

**राजकीय हस्तक्षेप थांबवा; अन्यथा राज्यपालांकडे दाद**

या प्रकरणातील कथित राजकीय हस्तक्षेप तातडीने थांबवून निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. जर हस्तक्षेप सुरूच राहिला, तर सर्व विरोधी पक्ष आणि लोकशाहीवादी शक्तींना एकत्र करून हा प्रश्न राज्यपालांपर्यंत नेण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. सोलापुरातील सत्ताधारी पक्षाकडून संबंधित नगरसेविकेला वाचविण्यासाठी प्रशासनावर कोणत्या पातळीपर्यंत दबाव आणला जात आहे, याचा संपूर्ण घटनाक्रम पुराव्यांसह जनतेसमोर मांडण्यात येईल, असेही आंदोलकांनी म्हटले आहे.

महानगरपालिकेच्या शाळेसाठी आरक्षित असलेल्या सार्वजनिक जागेचे संरक्षण, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई, एवढीच आपली मागणी असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले आहे. आता महापालिका प्रशासन या मुदतीत कोणती कार्यवाही करते आणि प्रस्तावित आंदोलनाची वेळ येण्यापूर्वी चौकशीला गती मिळते का, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे. या पत्रकार परिषदेस श्रीनिवास संगेपाग, चंद्रकांत यमगर आदी उपस्थित होते.

## सोलापूरचा निधी साताऱ्याच्या...

केवळ विरोधी पक्षांतील नेत्यांना आणि पदाधिकाऱ्यांना आमिषे दाखवून पक्षफोडाफोडीचे उद्योग केले जात आहेत.'

पालकमंत्र्यांवर यापूर्वी दाखल झालेले गुन्हे, एफआयआर आणि विविध कारवायांचा इतिहास सर्वश्रुत असून, सध्या सुरू असलेल्या निधीवाटपातील करामतींमुळे त्यांची कार्यपद्धती संशयाच्या भोवऱ्यात सापडली असल्याचे ते म्हणाले. आगामी विधान परिषद निवडणुकीत सुशिक्षित पदवीधर, शिक्षक आणि मतदार भाजपच्या या कारभाराचा निश्चित हिशोब चुकता करतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. या पत्रकार परिषदेस काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, शहराध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष महेश गादेकर, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, प्रशांत बाबर, प्रशांत गायकवाड आदी उपस्थित होते.

## 'मयुरी'

शिवशंभूचा ज्वलंत इतिहास कवितेतून मांडनार
अस्तित्व म्हणजे "मयुरी"

शिवराज्याभिषेक, शिवतेज, तेजपुरंदर, छत्रपती, आधी विठ्ठल
तु शंभू, हंबीर मामा, राणूअक्का, कविकलश,हिरोजी इंदुलीकर,

"मयुरी" तुमच्या या प्रत्येक कवितेतून आम्ही आमचा राजा फक्त
वाचतच नाहीं तर अनुभवतो सुद्धा...

"मयुरी" तुमच्या आयुष्याची व्याख्या काय ?
हे विचारल्यानंतर तुम्ही एका क्षणाचा ही विचार न करता
दिलेले उत्तर म्हणजे "माझ्या छत्रपतींचा इतिहास "

सुखाचा क्षण आणि दुखाचा सण
साजरा करणार व्यक्तिमहत्व म्हणजे "मयुरी"

आई जगदंबेच्या कृपा आशिवार्दाने तुम्हाला उदंड आयुष्य लाभो...
रायगडाच्या उंची एवढं तुमच यश असावं,
सह्यगिरी पर्वता एवढं तुमचं सुख असावं,

"मयुरी" तुमच्या श्वासातून इतिहासाच वादळ वाहतं,
तुमच्या बोलण्यातून ते आम्हाला जाणवतं,

"आॅऊसाहेब" जिजाऊ आपल्याला उत्तम आरोग्य देवों,
"छत्रपतींच्या" आशिवार्दाने गाठावी यशाची शिखरे,
आदर्श "शंभू" चा ठेवतो लाभो मस्तकी तुमच्या शौर्याचे तुरे... !

वाढदिवसाच्या तेजपुरंदर, शिवमय शुभेच्छा... !

- डॉ. शिवाज्ञा

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003

फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अ‍ॅड खतीब वकील.

Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# गान रसमंजरीच्या सुरांनी अक्कलकोटकर मंत्रमुग्ध; नवरात्र महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि न्यासाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त व हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा सौ. अलकाताई जनमेजयराजे भोसले व अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त व हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या सचिवा सौ. अर्पिताराजे अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. १८ ऑक्टोबर रोजीच्या सहाव्या पुष्पात महालक्ष्मी इव्हेंट्स प्रस्तुत गान रसमंजरी संगीत संध्या संजय हणुमंत लमाणी (बिग बॉस विनर तथा झी कन्नड सारेगमप गायक हावेरी), प्रगती बडीगेर (झी कन्नड सारेगमप सीजन १९ विजेत्या), अनन्या प्रकाश (प्रसिद्ध प्लेबॅक सिंगर बेंगळुरू) यांचा सुगम कन्नड जुन्या व नवीन गाण्यांच्या कार्यक्रमास भरभरून श्रोत्यांनी दाद दिली.कु.ऋतिका बिराजदार रा,आलमेल जि.विजापूर या ४ वर्षीय मुलीच्या भरतनाट्यम या नृत्यकलेने करण्यात आले. कु. ऋतिका बिराजदार ही श्रीक्षेत्र अक्कलकोटची नात आहे.

सदर कार्यक्रम श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था आणि समस्त हिरकणी सखी महिला यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. सदरचा कार्यक्रम श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ संचलित अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग ॲकॅडमी गट नं. ५८१, नवीन वाहनतळ, विरक्त मठाशेजारी अक्कलकोट येथे संपन्न झाला.



### श्रीक्षेत्र तुळजापूरला पायी जाणारे देवीभकतांना प्रसाद वाटप

याबरोबरच अन्नछत्र मंडळाकडून कोजागिरी पौर्णिमेनिमित्त गुरुवार दि.२२ ऑक्टोबर व शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर रोजी सालाबादप्रमाणे श्रीक्षेत्र तुळजापूरला पायी जाणारे देवीभकतांना वळसंग टोल नाका येथे महाप्रसाद दिला जाणार आहे. सदर महाप्रसाद सेवा गेल्या २० वर्षांपासून अन्नछत्र मंडळाकडून दिली जात आहे.

दरम्यान श्री तुळजाभवानी माता,श्री समर्थरुपी अन्नपूर्णा माता, राजमाता जिजाऊ, भारतरत्न, गानसम्राज्ञी लतादिदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे व नटराज मूर्तीचे पूजन व सहाव्या पुष्पाचे दीपप्रज्वलन नगरसेविका सुनंदा स्वामी, समाजसेविका मल्लमा पसारे, सुवर्णा साखरे, सुनंदा अष्टगी यांच्या हस्ते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा- अलकाताई जनमेजयराजे भोसले अध्यक्षतेखाली संपन्न झाले. याप्रसंगी अनुयाताई संदीप फुगे, सोनालीताई फुगे, डॉ. आसावरी पेडगावकर श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या सचिवा- सौ. अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, महानंदा स्वामी, दर्शना लेंगडे-खोबरे, कु.तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु.स्वामिनीराजे अमोलराजे भोसले,सरोजिनी शामराव मोरे, संगीता राठोड, कल्पना श्रीकांत मोरे, दिव्या मोरे, स्मिता कदम, स्वाती निकम, संगीता भोसले, उज्वला भोसले, अंजना पवार, पल्लवी कदम, कोमल क्षिरसागर, रूपा पवार, शितल क्षिरसागर, सुवर्णा घाटगे, कविता वाकडे, छाया पवार, कविता भोसले, अनिता गडदे, निशा बाबर, तृप्ती बाबर, उज्वला भोसले, स्वपना माने, ज्योती शिंदे या हिरकणी सखी महिला यांच्या हस्ते सर्व कलाकारांचा सत्कार श्री तुळजाभवानी मातेची प्रतिमा देऊन करण्यात आला. पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी यांच्या मंत्रोच्चारात आरती संपन्न झाली. दरम्यान कार्यक्रमाचा प्रारंभ कु.ऋतिका बिराजदार रा,आलमेल जि.विजापूर या ४ वर्षीय मुलीच्या भरतनाट्यम या नृत्यकलेने करण्यात आले. कु.ऋतिका बिराजदार ही श्रीक्षेत्र अक्कलकोटची नात आहे.

यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष- जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष- अमोलराजे जनमेजयराजे भोसले, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, समर्थ संदीप फुगे, उपाध्यक्ष- अभय खोबरे, सचिव- शामराव मोरे, खजिनदार लाला राठोड, पालखी परिक्रमा मुख्य संयोजक संतोष भोसले, मल्लिनाथ स्वामी, प्रा.सायबन्ना जाधव, बाळासाहेब कुलकर्णी, अशपाक काझी, सोमशेखर जमशेट्टी, शरणप्पा फुलारी, मनोज निकम, अरविंद शिंदे, सिद्धेश्वर मोरे, आकाश गडकरी, आकाश,सुर्यवंशी, बाबुशा महिंद्रकर, संजय गोंडाळ, सौरभ मोरे, रोहित खोबरे, वैभव मोरे, निखिल पाटील, भारत पाटील, सनी सोनटक्के, भरत राजेगावकर, रोहन शिर्के, प्रवीण देशमुख, शुभम सावंत, अतिश पवार, प्रशांत शिंदे-साठे, प्रवीण घाटगे, गोटू माने, आकाश शिंदे, योगेश पवार, समर्थ घाटगे,किरण साठे, सुमित घाटगे, अमित घाटगे, बसवराज इचगे, पिंटू आडवीतोटे, शरणप्पा काळरामे, चंद्रकांत कुंभार, स्वामिनाथ बाबर, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, प्रसाद हुल्ले, तानाजी पाटील, राजू पवार, महांतेश स्वामी, सुमित कल्याणी, सुरेश भोसले, विजय मोरे, मुन्ना कल्याणी, श्री चव्हाण, ज्योतिबा पवार, श्रीकांत सोमवंशी, महादेव अनगले, श्रीकांत स्वामी, ज्ञानेश्वर भोसले, बलभीम पवार, श्रीशैल कुंभार, राहूल इंडे, सागर पवार, असद फुलारी, स्वामीनाथ गुरव, विजय इंगळे, अभिषेक लोकापुरे, सिद्धेश्वर टाके, शिवप्पा रामपुरे, अनिल शिंदे, प्रा.परमेश्वर आरबाळे, प्रा.मनोज जगताप, आलमेलचे नगरसेवक अशोक गौडा, कोळारी-हिप्परगी, प्रसाद मोरे, अमर मसरे, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह या कार्यक्रमास समस्त विश्वस्त मंडळ, क्रियाशील सदस्य, कार्यकर्ते, व सेवेकरी, अन्नछत्र मंडळाची सहयोगी, हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था, अमोलराजे लेझीम संघ, अमोलराजे भोसले मित्र परिवार आदीजन उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन – श्वेता हुल्ले यांनी केले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट व सहयोगी संस्था हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था अक्कलकोट आणि समस्त हिरकणी सखी महिला, श्री तुळजाभवानी माता शारदीय नवरात्र महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम-२०२६ समारोप संपन्न झाला.

# आ. सचिन कल्याणशेट्टी यांचाच दबदबा कायम;

## सिद्धाराम म्हेत्रे व मल्लिकार्जुन पाटील यांना मोठा धक्का!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (DCC Bank) आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीवर घेतलेल्या हरकतींवर पुण्याचे विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी दिग्विजय आहेर यांच्या कार्यालयात चार दिवस चाललेली सुनावणी पूर्ण झाली आहे. या सुनावणीअंती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सोसायट्यांविरोधात घेतलेल्या सर्वच्या सर्व हरकती फेटाळल्या गेल्या असून, हा शिवसेनेचे सिद्धाराम म्हेत्रे आणि काँग्रेसचे मल्लिकार्जुन पाटील यांच्यासाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. प्रारूप मतदार यादीवर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सोसायट्यांच्या विरोधात एकूण ३४ हरकती विभागीय सहनिबंधक कार्यालयाकडे दाखल करण्यात आल्या होत्या. दिनांक ५, ६, ७ आणि ८ या चार दिवशी यावर सविस्तर सुनावणी पार पडली. सुनावणीअंती विभागीय सहनिबंधक दिग्विजय आहेर यांनी या ३४ च्या ३४ हरकती फेटाळून लावल्या. त्यामुळे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि त्यांच्या समर्थक सोसायट्यांना मोठा दिलासा मिळाला असून आमदार कल्याणशेट्टी यांचा डीसीसी बँकेच्या निवडणुकीत दबदबा दिसून येत आहे.

त्याचप्रमाणे काँग्रेसचे मल्लिकार्जुन पाटील यांच्या काशीलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जेऊर' या संस्थेच्या मतदार यादीतील समावेशावर हरकत घेण्यात आली होती. ही हरकत विभागीय सहनिबंधक कार्यालयाने मान्य करत काशीलिंग पतसंस्थेचे नाव मतदार यादीतून वगळण्याचा निर्णय दिला आहे. हा निर्णय मल्लिकार्जुन पाटील यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. यासोबतच इतर २३ सोसायट्यांनी वर्गवारीबाबत घेतलेली हरकत विभागीय सहनिबंधकांनी मान्य केली आहे. या सोसायट्यांचे वर्गीकरण आता नियमानुसार विशिष्ट वर्गामध्ये करण्यात आले आहे. मतदार यादीतील नाव दुरुस्तीसाठी दाखल करण्यात आलेल्या इतर १४ हरकती सुनावणीदरम्यान मान्य करण्यात आल्या असून, त्यानुसार मतदार यादीत आवश्यक त्या सुधारणा केल्या जाणार आहेत. या संपूर्ण निवडणूक हरकत व सुनावणीच्या प्रक्रियेत संबंधित सोसायट्यांच्या वतीने ॲडव्होकेट उमेश मराठे आणि ॲडव्होकेट समर्थ दरेकर यांनी बाजू मांडली व संपूर्ण कायदेशीर कामकाज पाहिले.

# घाटणे बॅरेज बाधित शेतजमिनींची आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे फेरमोजणी करा - जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत घाटणे बॅरेजच्या बुडीत क्षेत्रात बाधित होणाऱ्या भोयरे, घाटणे आणि दाईगडेवाडी येथील शेतजमिनींची आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून फेरमोजणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज संबंधित पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच नरखेड व खरकटणे येथील शेतजमिनींच्या संपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.




घाटणे बॅरेजमुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध अडचणींबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बॅरेजच्या बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या भोयरे, घाटणे, दाईगडेवाडी, मलिकपेठ, नरखेड आणि खरकटणे या गावांतील शेतजमिनींच्या फेरमोजणीसह भूसंपादनाच्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार भूसंपादनाच्या सीमा आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने निश्चित करून भोयरे, घाटणे आणि दाईगडेवाडी या गावांतील जमिनींची फेरमोजणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले. नरखेड व खरकटणे येथील बाधित शेतजमिनींची करण्यात आलेली मोजणी शेतकऱ्यांना मान्य असल्याने, त्यानुसार पुढील कार्यवाही तातडीने पूर्ण करून जमिनी खरेदीची प्रक्रिया सुरू करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### स्थानिक शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही

घाटणे बॅरेजमधून स्थानिक शेतकऱ्यांना वापरासाठी पाणी उपलब्ध करून देणे तसेच कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पातून धाराशिव जिल्ह्याला पाणी देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. हे दोन्ही विषय धोरणात्मक स्वरूपाचे असल्याने शासनस्तरावर आवश्यक त्या परवानग्या घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

दरम्यान, बॅरेजच्या खालच्या बाजूस पाण्याच्या प्रवाहामुळे खरडून गेलेल्या जमिनींच्या भूसंपादनाचा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला. या जमिनींचे संपादन करण्यासाठी विशेष बाब म्हणून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सोलापूर पाटबंधारे विभागाला देण्यात आल्या.

बैठकीस उपजिल्हाधिकारी डॉ. सीमा होळकर, धाराशिव पाटबंधारे मंडळाचे कार्यकारी अभियंता अमोल नाईक, सोलापूर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता पवार, मोहोळचे तहसीलदार, उपअधीक्षक भूमी अभिलेख, मोहोळ तसेच घाटणे बॅरेज परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी आणि शेतकरी उपस्थित होते.

### जाहीर प्रसिध्दीकरण

क्रि. कि. अर्ज नं. १५२/२०२६

**मोहोळ येथील मे.ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट वर्ग-१ सो, यांचे कोर्टात**

श्री. प्रमोद रावण खंदारे,वय-४२ वर्षे,धंदा-शेती, रा. यावली, ता. मोहोळ, जि. सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत यावली,ता. मोहोळ,(अर्जाची नोटीस ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत यावली, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा मुलगा म्हणजेच विनायक प्रमोद खंदारे याचा जन्म ता. १४/०७/२०११ रोजी मौजे यावली, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा मुलगा म्हणजेच विनायक प्रमोद खंदारे याची जन्म दाखल्याची ता. १४/०७/२०११ रोजीप्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जूलै २०११ चे अभिलेखात अर्जदाराचा मुलगा म्हणजेच विनायक प्रमोद खंदारे याची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.०२/१२/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १९/१०/२०२६

हुकुमावरुन

लिपीक, ज्यु.मॅ.वर्ग-१ सो,मोहोळ (शिक्का) सहा. अधिक्षक, ज्यु. मॅ. वर्ग-१ सो,मोहोळ

# मामासाहेब पांढरे यांचा भाजपात प्रवेश !

## पालकमंत्री गोरे, राम सातपुते आणि बाबाराजे देशमुख यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले युवा नेतृत्व मामासाहेब पांढरे यांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असून. राज्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार रामभाऊ सातपुते तसेच भाजपाचे नेते व सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश होणार आहे. पांढरे यांच्या भाजप प्रवेशामुळे माळशिरस तालुक्यातील राजकीय वतुर्ळात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.



मामासाहेब पांढरे हे राजकीय, सामाजिक क्षेत्रात तरुणांशी जोडलेले नेतृत्व म्हणून परिचित आहेत. सामाजिक उपक्रमांमधील सहभाग, युवकांशी असलेला संपर्क आणि स्थानिक पातळीवरील सक्रियतेच्या जोरावर त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणांवर काय परिणाम होणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता व्यक्त होत आहे.

विजयादशमी हा शुभमुहूर्त साधत पांढरे यांनी भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याने या घडामोडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्यातील भाजप नेतृत्वाशी संबंधित प्रमुख पदाधिकारी आणि जिल्ह्यातील नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या या पक्षप्रवेशामुळे माळशिरस तालुक्यातील भाजपच्या संघटनात्मक वाटचालीच्या दृष्टीनेही या घडामोडीकडे पाहिले जात आहे.

माळशिरस तालुक्यात विविध राजकीय प्रवाह आणि स्थानिक नेतृत्व यांचा प्रभाव राहिला आहे. अशा परिस्थितीत तरुण नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या मामासाहेब पांढरे यांनी भाजपमध्ये प्रवेशामुळे आगामी काळात स्थानिक राजकारणात कोणते बदल घडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यांच्या प्रवेशामुळे भाजपच्या स्थानिक संघटनात्मक कामकाजाला कोणते नवे बळ मिळते आणि पांढरे यांची पुढील राजकीय वाटचाल कोणत्या दिशेने होते, हे येणारा काळच स्पष्ट करेल.

विजयादशमीच्या मुहूर्तावर झालेला हा पक्षप्रवेश माळशिरस तालुक्यातील राजकीय घडामोडींमध्ये महत्त्वाची भर मानला जात असून, आगामी काळातील राजकीय हालचालींबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## कल्याणशेट्टी प्रशालेतील विद्यार्थ्याची पुणे येथील विभागस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने पंढरपूर येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कुमार सिद्धाराम भोजण्णा जमादार हा विद्यार्थी 14 वषार्खालील वयोगटातून 100 व 200 मीटर धावणे या दोन्ही स्पर्धेत जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळवला असून आता त्याची विभागीय क्रीडा स्पर्धेत निवड झालेली आहे. त्याच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी कामगिरीबद्दल तालुक्यातील ग्रामीण भागातून कौतुक होत आहे. सिद्धाराम जमादार हा विद्यार्थी हसापूर सारख्या ग्रामीण भागातून आलेला अतिशय गरीब कुटुंबातील असून आई-वडिलांचे आशीर्वाद व क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन याबरोबरच रोज मैदानावर खेळणे, सातत्याने सराव करणे तसेच खेळाविषयी आवड, जिद्द, चिकाटी यामुळे तो यशस्वी झाल्याचे सांगितला.

यशस्वी विद्यार्थ्यास क्रीडाशिक्षक कुमार जाधव व श्रीशैल किणगे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले आहे.



यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभागप्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप यांनी अभिनंदन केले आहे.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

## Classified - छोटी जाहीरात

**बोअरवेल**
**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) भारतीय क्रिकेटमधील एक माजी फलंदाज, इरफान पठाणचा भाऊ २) आशिर्वाद, नवरा मुलगा ३) पाणी, उदक ४) राजाचे दरबारातील बसण्याचे आसन ५) बंदूक (इंग्रजीत) ६) पाणी पिण्याची तीव्र इच्छा ७) सोने ८) चिखल, राडा ११) एकरूप, तल्लीन १३) शिजवलेला तांदूळ १५) राहुल गांधी यांचे चुलतबंधू १७) कोकणातील भाजपचे आमदार-नितेश ** १९) जहाज २०) स्वामी तिन्ही जगाचा आईविना *** २२) चार आणि तीन मिळून होणारी संख्या २५) शिवसेनेचे महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री २६) जोराची आरोळी (हिंदीत)२९) कर्नाटकातील एक जिल्हा ३१) अहमदनगरचे खासदार-*** विखे ३२) ज्ञान (हिंदीत) ३३) जर उलट लिहा ३५) वायू, पवन ३९) राष्ट्रवादीचे निवडणूक चिन्ह ४१) हनुमानाच्या हातातील शस्त्र ४३) ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे जावई-सदानंद ** ४४) मराठी वर्षातील एक महिना ४५) पारंब्या असलेला वृक्ष ४६) फळ्यावर लिहिण्यासाठी हा वापरतात ४७) पत्र (हिंदीत) ४८) एक हजार कि.ग्रॅ.- एक ** ४९) शरीर, काया

**आडवे शब्द :** १) भारतीय क्रिकेट टीममधून निवृत्त झालेला एक डावखुरा फलंदाज
६) नशीब (हिंदीत)
९) गाण्यातील लय, एक जुना ग्रामीण खेळ-** पारंब्या
१०) बारीकसारीक
१२) एक म्हण-** तो कान पिळी१४) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा
१६) भाकरी थापण्याचे मोठे पात्र १८) शहर
२१) मुंबई लगतचा एक जिल्हा
२३) लहान बाळाला टोचतात ती २४) उत्सवाचा दिवस २५) स्वार्थ, हेतू
२७) उन्हाळ्यातील एक महिना २८) कौरवांची आई ३०) वाईट सवय, तल उलट लिहा ३१) भाजप नेते -*** मुनगंटीवार ३२) अकरा (हिंदीत)
३४) पाकचे एक माजी पंतप्रधान-*** शरीफ ३६) पाण्याचे बाष्परूप ३७) दृष्टी
३८) रांग ४०) छ. शिवरायांच्या राजधानीचा किल्ला
४२) ऋतिक रोशन अभिनीत एक चित्रपट-** - अकबर ४४) आईची बहीण
४६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ४९) तलाव ५०) केळांचा समूह
५१) बेसनाच्या पिठाच्या बुंदीपासून बनवितात तो गोलाकार गोड पदार्थ
५२) भारताचा एक माजी विकेटकिपर-*** मोंगिया

## सुडोकु - 81

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 5 | | | | 4 | 3 |
| 4 | 7 | | 1 | | 2 | | 5 | |
| | | | | | | 2 | 9 | 1 |
| 9 | | 3 | 4 | | | 5 | 8 | 6 |
| 6 | | | | | 5 | | 2 | |
| | 5 | | | | | 1 | 7 | |
| 3 | | 5 | 8 | | | 9 | 6 | 2 |
| | 2 | 6 | 3 | | 9 | 8 | | 5 |
| 8 | | | | 5 | | | | |

# प्रलंबित देयकांसाठी कंत्राटदारांचे जोरदार ठिय्या आंदोलन; दिवाळीपूर्वी पैसे देण्याची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील विविध शासकीय विभागांकडील प्रलंबित देयके तातडीने अदा करावीत, कंत्राटदारांच्या आत्महत्यांच्या घटनांची गंभीर दखल घ्यावी आणि कंत्राटदारांच्या विविध मागण्यांवर शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, या मागण्यांसाठी सोमवारी (दि. १९ ऑक्टोबर २०२६) सोलापुरातील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पूनम गेट येथे कंत्राटदारांनी जोरदार ठिय्या आंदोलन केले. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि विविध कंत्राटदार संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला. आंदोलनादरम्यान जोरदार घोषणाबाजी करून निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनात महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना, सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशन, महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना, सोलापूर महानगरपालिका कंत्राटदार असोसिएशन तसेच हॉटमिक्स असोसिएशन सहभागी झाल्या होत्या. विविध विभागांमध्ये शासकीय कामे करणाऱ्या कंत्राटदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले.



**कंत्राटदारांच्या आत्महत्यांप्रकरणी मदतीची मागणी**

प्रलंबित देयके आणि आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर आत्महत्या केलेल्या नऊ कंत्राटदारांच्या कुटुंबीयांना भरीव शासकीय आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. तसेच कंत्राटदारांच्या समस्यांचा सखोल अभ्यास करून उपाययोजना सुचविण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागांच्या मंत्र्यांच्या पुढाकाराने तातडीने अभ्यास समिती स्थापन करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली.

**जीएसटीच्या निर्णयाला विरोध**

शासकीय कामांची प्रलंबित देयके मिळण्यापूर्वीच जीएसटी भरण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करून तो तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी संघटनांनी केली. देयके वेळेवर मिळत नसताना करभरण्याची जबाबदारी पार पाडताना कंत्राटदारांना आर्थिक अडचणींना सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**दिवाळीपूर्वी प्रलंबित देयके अदा करा**

राज्यातील विविध शासकीय विभागांकडील कंत्राटदारांची कोट्यवधी रुपयांची देयके प्रलंबित असल्याने आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. कामे पूर्ण करूनही वेळेवर पैसे मिळत नसल्यामुळे कंत्राटदारांना आर्थिक व्यवहार सांभाळणे कठीण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. राज्यातील सर्व विभागांकडील प्रलंबित देयके दिवाळीपूर्वी तातडीने अदा करावीत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम विभागासह जलजीवन मिशन, आदिवासी विकास, पर्यटन, जलसंपदा, ग्रामविकास, जलसंधारण आणि नगरविकास विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर देयके थकली असल्याचा दावा संघटनांनी केला. निवेदनानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाची २७ हजार कोटी रुपये, जलजीवन मिशनची ३८ हजार कोटी रुपये, आदिवासी विभागाची ११ हजार कोटी रुपये, पर्यटन विभागाची २,५०० कोटी रुपये, जलसंपदा विभागाची ३,५०० कोटी रुपये, ग्रामविकास विभागाची ३ हजार कोटी रुपये, जलसंधारण विभागाची २,४०० कोटी रुपये आणि नगरविकास व इतर विभागांची १७ हजार कोटी रुपयांची देयके प्रलंबित असल्याचे संघटनांनी म्हटले आहे. या आकडेवारीची स्वतंत्र अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे.

**वाढत्या दरांनुसार अंदाजपत्रकात सुधारणा करा**

डांबर, सिमेंट, स्टील, रंग, खडी, मुरूम यांसह बांधकामासाठी आवश्यक असलेल्या विविध साहित्याच्या किमती वाढल्या आहेत. त्यामुळे नवीन कामांची अंदाजपत्रके तयार करताना बाजारातील चालू दरांचा समावेश करावा, तसेच एक लाख ते अडीच कोटी रुपयांपर्यंतच्या जुन्या निविदांमधील, पूर्ण झालेल्या आणि प्रगतिपथावर असलेल्या कामांसाठी नियमानुसार भाववाढ मंजूर करावी, अशी मागणी करण्यात आली.

भाववाढीमुळे वाढलेला आर्थिक भार लक्षात घेऊन कामांच्या अटींमध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात आणि कंत्राटदारांना दिलासा द्यावा, असेही संघटनांनी निवेदनात म्हटले आहे.

**ई-निविदा प्रक्रियेतील हस्तक्षेप थांबविण्याची मागणी**

विविध शासकीय विभागांतील ऑनलाइन ई-निविदा प्रक्रियेत राजकीय लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप होत असल्याचा आरोप संघटनांनी केला. निविदा प्रक्रियेत पारदर्शकता राखून निकोप स्पर्धेला प्रोत्साहन द्यावे आणि कंत्राटदारांना समान संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

**विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित**

या आंदोलनात महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेचे तसेच महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे राज्याध्यक्ष अभियंता मिलिंद भोसले, कर्नाटक कंत्राटदार असोसिएशनचे महासचिव एच. आर. चिंचली, सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशनचे अध्यक्ष शंकरराव चौगुले, सोलापूर महानगरपालिका कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष रामभाऊ दुधाळ, अभियंता संघटनेचे राज्य विभागीय अध्यक्ष कांतीलाल दूबल, पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे कार्याध्यक्ष आनंद तोडकरी, सचिव कैलास लांडे आणि संघटक नरेंद्र भोसले यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सोमनाथ दावणे, विनोद क्षीरसागर, विनोद चव्हाण, सूर्यकांत बिराजदार, संजय देशपांडे, मनोहर शिराळ, गोविंद अनागुंडे, प्रमोद कुलाल, हनुमंत तरंगे, बाळासाहेब वाघमोडे, बाळासाहेब मोटे, दिनेश झांबरे, सचिन जाधव, संतोष लाबगुंडे, विजय मुलगे, विवेकानंद तरंगे, अण्णाराव पाटील, गणेश भालेराव, महेश जाधव, शशिकांत शिंदे, गणपत मस्के, पोपट शेंबडे, राजकुमार खुर्द, मधुकर पवार, अभिजीत गायकवाड, पी. बी. माने, अजित साठे, शेखर शिवशरण, श्रीकांत सोनी, प्रफुल्ल शिंदे, प्रतीक मशाले, बी. व्ही. राठोड, सचिन गुंड, निशांत मंजेली, हैबतराव देशमुख, महादेव सरगर, शिवानंद पाटील, शांतप्पा ढंगापुरे, अविनाश चेळेकर आणि संजय डांगे यांच्यासह सुमारे २०० कंत्राटदार व विकासकामांशी संबंधित प्रतिनिधी सहभागी झाले होते.

प्रलंबित देयके, वाढलेले बांधकाम साहित्याचे दर आणि आर्थिक अडचणींमुळे कंत्राटदारांमध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आता शासन या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते आणि प्रलंबित देयकांच्या प्रश्नावर काय कार्यवाही करते, याकडे कंत्राटदारांचे लक्ष लागले आहे.

# माजी आमदार दत्तात्रय सावंत यांना विविध शिक्षक संघटनांचा जाहीर पाठिंबा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील राजकीय आणि शैक्षणिक वतुर्ळातील घडामोडींना प्रचंड वेग आला आहे. शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, जुनी पेन्शन योजना आणि अनुदानाचा लढा विधिमंडळात प्रभावीपणे मांडणारे खंबीर नेतृत्व म्हणून माजी आमदार दत्तात्रय अच्युतराव सावंत यांना सोलापूर जिल्ह्यातील विविध प्रमुख शिक्षक संघटनांनी एकत्र येत आपला जाहीर पाठिंबा घोषित केल्याची माहिती डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनील चव्हाण यांनी दिली. या जाहीर पाठिंब्यामुळे सावंत यांच्या उमेदवारीला मोठी ताकद मिळाली असून त्यांची बाजू अधिक भक्कम झाली आहे.



**या प्रमुख संघटनांनी दिला पाठिंबाः**

दत्तात्रय सावंत यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील २५ वर्षांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत खालील संघटनांनी त्यांना अधिकृत पाठिंबा दिला

1. बहुजन शिक्षक महासंघ
2. डॉ पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद
3. सोलापूर जिल्हा शैक्षणिक कला शिक्षक संघ
4. अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटना
5. युवक शिक्षक कर्मचारी संघटना

**प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती आणि निधार्रः**

या महत्त्वपूर्ण बैठकीत व पाठिंबा घोषणा प्रसंगी शिक्षक चळवळीतील आघाडीचे नेते आणि पदाधिकारी अण्णासाहेब भालशंकर, सुनील चव्हाण, संतोष धारेराव, अ गफूर अरब आणि उल्हास बिराजदार यांनी आपली भूमिका मांडली.

"शिक्षकांच्या अडचणीच्या काळात अहोरात्र धावून जाणारे आणि रस्त्यावरील लढाईपासून ते शासनदरबारी आवाज उठवणारे दत्तात्रय सावंत हेच शिक्षकांचे खरे कैवारी आहेत," असा विश्वास यावेळी उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला. तसेच, यंदाच्या निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातील संपूर्ण शिक्षक बांधव एकजुटीने सावंत सरांना पहिल्या पसंतीचे मत देऊन प्रचंड बहुमताने विजयी करतील, असा निर्धार अण्णासाहेब भालशंकर, सुनील चव्हाण आणि संतोष भालेराव यांनी बोलून दाखवले.

**निवडणुकीत सावंतांचे पारडे जडः**

दत्तात्रय सावंत हे थेट लोकवर्गणी आणि शिक्षकांच्या थेट संपकार्तून ही निवडणूक लढवत आहेत. मागील निवडणुकीत अत्यंत निसटता पराभव झालेल्या सावंत यांना यंदा सोलापुरातून मिळालेल्या या सर्वसमावेशक पाठिंब्यामुळे प्रतिस्पर्धी उमेदवारांसमोर मोठे आव्हान उभे राहिले असून, शिक्षक मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ऑर्किड स्कूलच्या विद्यार्थ्यांचा फुटबॉल स्पर्धेत ब्राँझ मेडल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील नामांकित नागेश करजगी ऑर्किड स्कूल मधील विद्यार्थ्यार्ने शालेय शहरस्तरीय फुटबॉल क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत तृतीय क्रमांक प्राप्त केले आहे. या स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सोमपा क्रीडा कार्यालय सोलापूर शालेय शहरस्तरीय फुटबॉल क्रीडा स्पर्धेत सोलाउत्कृष्ट तांत्रिक खेळ, अष्टपैलु कामगिरी आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी प्रतिस्पर्ध्यावर मात करत तृतीय क्रमांक प्राप्त केलेले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा सौ. वषार्ताई विभुते, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, स्कूलच्या मार्गदशीर्का मीना पारखे, प्राचार्या रश्मी कुंभार यांनी शुभेच्छा दिल्या. वरील सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा विभाग प्रमुख आनंद लिगाडे, ज्ञानदीप जाधव यांनी मार्गदर्शन केले.

# अकलूजमध्ये अत्याधुनिक अग्निशमन केंद्र उभारणार

## एक कोटी ९० लाखांचा निधी मंजूर – शिवतेजसिंह मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात येत असून, नवीन बाजारतळ येथे अत्याधुनिक अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहे. यासाठी एक कोटी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून, त्यामध्ये एक कोटींचे केंद्र व ९० लाख रुपये किमतीचे अत्याधुनिक अग्निशमन याचा समावेश आहे. या केंद्रासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.



अकलूज येथील नवीन बाजारतळ परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करण्यासाठी मोहिते-पाटील यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी फळे व भाजीपाला विक्रेत्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. या वेळी त्यांनी प्रस्तावित अग्निशमन केंद्राची माहिती दिली. यावेळी नगराध्यक्षा रेशमाताई अडगळे, नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, विलास क्षीरसागर, प्रतिभा गायकवाड, अझर शेख, मिलिंद कोतमिरे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अकलूज शहराची वाढती व्याप्ती, वाढती लोकवस्ती, व्यापारी आस्थापना, बाजारपेठा आणि नागरी वस्ती लक्षात घेता अत्याधुनिक अग्निशमन केंद्राची उभारणी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शहरात किंवा परिसरात आगीची दुर्घटना घडल्यास अग्निशमन दल वेळेत घटनास्थळी पोहोचणे आणि आगीवर तातडीने नियंत्रण मिळविणे अत्यंत आवश्यक असते. नवीन बाजारतळ येथे अग्निशमन केंद्र उभारल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत मदत पोहोचविण्याची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

विशेषतः बाजारपेठेतील दुकाने, व्यापारी गाळे, निवासी इमारती, गोदामे तसेच गर्दीच्या ठिकाणी आग लागल्यास वेळीच उपाययोजना करणे शक्य होऊ शकते. आगीचा प्रसार रोखणे, नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याच्या कार्यात मदत करणे आणि मालमत्तेचे होणारे नुकसान कमी करण्यासाठी अग्निशमन दलाची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे या केंद्राचा लाभ केवळ अकलूज शहरालाच नव्हे, तर प्रतिसाद क्षेत्रात समाविष्ट असलेल्या आसपासच्या भागांनाही मिळू शकतो.

या प्रकल्पासाठी एक कोटी रुपयांचे अग्निशमन केंद्र आणि ९० लाख रुपयांचे अग्निशमन वाहन मंजूर झाले आहे. अग्निशमन वाहन आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उपलब्धता यामुळे आगीच्या दुर्घटनांबरोबरच इतर आपत्कालीन परिस्थितींमध्येही अधिक प्रभावीपणे प्रतिसाद देण्यास मदत होईल. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमुळे आग विझविण्याच्या मोहिमा अधिक नियोजनबद्ध पद्धतीने राबविणे, आवश्यक सुरक्षा उपाय करणे आणि नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्याच्या कामाला गती मिळू शकते.

अकलूज शहरात नागरी सुविधांचा विस्तार करतानाच नागरिकांच्या सुरक्षिततेलाही प्राधान्य देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नवीन बाजारतळ येथे प्रस्तावित अत्याधुनिक अग्निशमन केंद्र आणि अग्निशमन वाहनामुळे शहराच्या आपत्कालीन सेवा व्यवस्थेला बळकटी मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, या सुविधांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी केंद्राची उभारणी, वाहनाची उपलब्धता आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती वेळेत होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पोलीस खात्यातील रणरागिनी! पीएसआय सोनल मोरे यांची संवेदनशील कार्यशैली

## पीडितांना दिलासा, तरुणांना नवी दिशा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नवरात्रोत्सव म्हणजे आदिशक्तीचा जागर, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा! याच स्त्रीशक्तीचे दर्शन पोलीस खात्यात कर्तव्य बजावणाऱ्या रणरागिनींच्या कायार्तून घडते. नातेपुते पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) सोनल मोरे या आपल्या संवेदनशील कार्यशैलीतून, कर्तव्यनिष्ठेतून आणि सामाजिक बांधिलकीतून पोलीस खात्यातील स्त्रीशक्तीचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहेत.



कायद्याची अंमलबजावणी करताना केवळ गुन्हेगारांवर कारवाई करणे एवढेच पोलिसांचे काम नसून, पीडित व्यक्तीला न्याय मिळवून देणे, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मानसिक आधार देणे आणि समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हीदेखील पोलिसांची महत्त्वाची जबाबदारी आहे. हीच जाणीव ठेवून पीएसआय सोनल मोरे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पीडितांच्या तक्रारी संवेदनशीलपणे समजून घेऊन त्यांचे निवारण करण्यासाठी प्रयत्नशील असतात. तक्रार घेऊन आलेल्या व्यक्तीला धीर देणे, तिची व्यथा समजून घेणे आणि कायदेशीर प्रक्रियेबाबत योग्य मार्गदर्शन करणे, या बाबींना त्या महत्त्व देतात.

**दामिनी पथकाच्या माध्यमातून तरुणांना योग्य दिशा**

आजच्या काळात महिला व मुलींची सुरक्षितता हा समाजासमोरील महत्त्वाचा विषय आहे. महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे, त्यांच्याविषयी आदराची भावना निर्माण व्हावी आणि तरुणांमध्ये कायद्याबद्दल जागरूकता वाढावी, यासाठी पोलीस यंत्रणेची भूमिका महत्त्वाची आहे. दामिनी पथकाच्या माध्यमातून गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळणाऱ्या तरुणांना समज देऊन योग्य मार्गावर आणणे, त्यांच्यामध्ये सामाजिक भान निर्माण करणे आणि महिलांच्या सन्मानाचे महत्त्व पटवून देणे, अशा उपक्रमांना पीएसआय सोनल मोरे महत्त्व देतात.

समाजातील गोरगरीब, वंचित आणि अन्यायग्रस्त व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस यंत्रणेने संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक आहे. कायद्याचा धाक आणि माणुसकीचा ओलावा यांचा समतोल साधत जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करण्याचे काम अशा अधिकारी आपल्या कर्तव्याच्या माध्यमातून करतात.

**ज्युलिओ रिबेरो यांच्याकडून प्रेरणा, वडील बापूराव मोरे आदर्श!**

आपल्या कायामार्गील प्रेरणेविषयी बोलताना पीएसआय सोनल मोरे या पोलीस अधिकारी ज्युलिओ रिबेरो यांना आपले प्रेरणास्थान मानतात. तसेच, आपले वडील बापूराव मोरे हे आपल्यासाठी आदर्श व्यक्तिमत्त्व असल्याचे त्या सांगतात. कुटुंबातून मिळालेले संस्कार, वरिष्ठांचे मार्गदर्शन आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा यांतूनच समाजासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची प्रेरणा मिळते, अशी त्यांची भावना आहे.

पोलीस खात्यातील जबाबदारी सांभाळताना संयम, धैर्य, तत्परता आणि संवेदनशीलता या गुणांची आवश्यकता असते. महिला व मुलींच्या सुरक्षेपासून पीडितांना आधार देण्यापर्यंत आणि तरुणांना योग्य दिशा दाखविण्यापर्यंत पोलिसांची भूमिका समाजजीवनाशी जोडलेली आहे. या भूमिकेकडे केवळ नोकरी म्हणून न पाहता सामाजिक जबाबदारी म्हणून पाहणाऱ्या सोनल मोरे यांचे कार्य विशेष लक्षवेधी ठरते.

नवरात्रोत्सवात आदिशक्तीची पूजा करताना स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा संदेश दिला जातो. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य, संकटात सापडलेल्यांना मदतीचा हात देण्याची वृत्ती आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी तत्पर राहण्याची भूमिका या गुणांमधून स्त्रीशक्तीचे खरे सामर्थ्य दिसून येते. कर्तव्याच्या वदीर्तून जनतेला सुरक्षिततेचा विश्वास देणाऱ्या आणि संवेदनशीलतेतून माणुसकी जपणाऱ्या पीएसआय सोनल मोरे या नवरात्रोत्सवानिमित्त पोलीस खात्यातील रणरागिनी म्हणून प्रेरणादायी ठरत आहेत.

# इंचगाव टोलनाक्याजवळ स्विफ्ट कारसह १७ किलो गांजा जप्त

## १५.७९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारच्या 'नशामुक्त भारत' मोहिमेअंतर्गत अमली पदार्थाविरोधात राबवलेल्या विशेष मोहिमेत सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने (छउइ) धडाकेबाज कामगिरी केली आहे. सोलापूर-मिरज महामार्गावरील इंचगाव टोलनाक्याजवळ सापळा रचून पोलिसांनी एका स्विफ्ट कारमधून तब्बल १७ किलो ९९४ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या कारवाईत गांजा, मारुती स्विफ्ट कार आणि मोबाईल असा एकूण १५ लाख ७९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिलेल्या विशेष सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी अंमली पदार्थ विरोधी कारवाईसाठी पथके तैनात केली होती.

सपोनि विजय शिंदे यांच्या पथकातील पोलीस कॉन्स्टेबल मनोज राठोड (ब.नं. ५८०) यांना गोपनीय बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली होती की, कामती पोलीस ठाण्याच्या हद्दीतून सोलापूर-मिरज महामार्गावरून एक इसम मारुती सुझुकी स्विफ्ट कारमधून मोठ्या प्रमाणात गांजा घेऊन जात आहे. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक संजय जगताप आणि त्यांच्या पथकाने कामतीकडून बेगमपूरच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावरील इंचगाव टोलनाक्याजवळ सापळा रचला.



संशयित पांढऱ्या रंगाची मारुती स्विफ्ट कार (क्रमांक MH 10 DQ 8897) येताच पोलिसांनी सतर्क होऊन गाडीला अडवले आणि चालकाला जागीच पकडले. चौकशीत त्याने आपले नाव शुभम लालासाहेब काळे (वय २८, मूळ रा. हरंगुळ रेल्वे जवळ, बार्शी रोड एमआयडीसी, लातूर; सध्या रा. आंबेडकर नगर, अरळी कॉर्नर, जत, जि. सांगली) असे सांगितले.

गाडीतील पोत्याबाबत विचारणा केली असता आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. पंचांसमक्ष पोत्याची तपासणी केली असता त्यात उग्र वास असलेला, ओलसर हिरव्या रंगाचा, पाने, बिया आणि बोंडे असलेला ८ लाख ९९ हजार ७०० रुपये किमतीचा १७ किलो ९९४ ग्रॅम गांजा मिळून आला. पोलिसांनी गांजासह स्विफ्ट कार आणि मोबाईल फोन असा एकूण १५,७९,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सदरची धडक कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, अप्पर पोलीस अधीक्षक (पंढरपूर) श्रीमती प्रेरणा कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप, सपोनि विजय शिंदे, पोलीस हवालदार दशरथ गोरे, अविनाश पाटील, रवी माने, अतुल घाडगे, पोलीस कॉन्स्टेबल अनवर आत्तार यांच्या टीम ने केली आहे.

# सोलापूर जिल्ह्यात ई-केवायसी पूर्णत्वाचे प्रमाण 80.47 टक्क्यांवर

## 3 लाख 47 हजार 511 सदस्यांची ई-केवायसी अद्याप अपूर्ण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील ई-केवायसी प्रगती अहवालानुसार, 19 ऑक्टोबर 2026 रोजी ई-केवायसी पूर्णत्वाचे प्रमाण 80.47 टक्के झाले आहे. 15 ऑक्टोबर रोजी हे प्रमाण 80.34 टक्के होते. चार दिवसांत ई-केवायसी पूर्णत्वाच्या प्रमाणात 0.13 टक्क्यांची वाढ झाली आहे. जिल्ह्यातील 11 तालुक्यांमध्ये एकूण 17 लाख 79 हजार 815 आधार संलग्न सदस्य असून, त्यापैकी 10 लाख 44 हजार 066 सदस्यांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली आहे.

ई-केवायसी प्रक्रियेत सांगोला तालुक्याचे प्रमाण सर्वाधिक 85.62 टक्के आहे. त्यानंतर पंढरपूर तालुक्यात 82.64 टक्के, माढा तालुक्यात 82.20 टक्के, उत्तर सोलापूर तालुक्यात 81.11 टक्के आणि अक्कलकोट तालुक्यात 80.59 टक्के ई-केवायसी पूर्ण झाली आहे. करमाळा तालुक्यात 80.46 टक्के, दक्षिण सोलापूरमध्ये 79.43 टक्के, मंगळवेढा तालुक्यात 79.12 टक्के, माळशिरस तालुक्यात 78.56 टक्के, मोहोळ तालुक्यात 78.38 टक्के आणि बार्शी तालुक्यात 77.96 टक्के ई-केवायसी पूर्णत्वाची नोंद आहे.

जिल्ह्यात अद्याप 3 लाख 47 हजार 511 सदस्यांची ई-केवायसी पूर्ण झालेली नाही. एकूण आधार संलग्न सदस्यांच्या तुलनेत हे प्रमाण 19.53 टक्के आहे. तालुकानिहाय अपूर्ण ई-केवायसीमध्ये माळशिरस तालुक्यात सर्वाधिक 58 हजार 602 सदस्य, बार्शी तालुक्यात 48 हजार 494, माढा तालुक्यात 34 हजार 114, पंढरपूर तालुक्यात 31 हजार 358 आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात 31 हजार 151 सदस्यांचा समावेश आहे.

ई-केवायसी प्रक्रियेत काही तालुक्यांमध्ये सुधारणा दिसून येत असली, तरी जिल्ह्याचे एकूण प्रमाण अद्याप 81 टक्क्यांच्या खाली आहे. त्यामुळे उर्वरित पात्र सदस्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी तालुकानिहाय प्रगतीचा आढावा घेणे आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**तालुकानिहाय प्रगतीवर एक नजरः** 19 ऑक्टोबरच्या अहवालानुसार सांगोला तालुका 85.62 टक्क्यांसह प्रथम क्रमांकावर, तर बार्शी तालुका 77.96 टक्क्यांसह शेवटच्या क्रमांकावर आहे. जिल्ह्याची एकूण प्रगती 80.47 टक्के असून, 19.53 टक्के सदस्यांची ई-केवायसी अद्याप अपूर्ण आहे.